नियमित दिवाणी कज्जा नं.१७/२०१६ मधील नि.क्र.३१ खालील आदेश
(पारित दिनांक-०२/०१/२०२३)

शंकर दुंडाप्पा मगदुम **वि.** बबन महादेव गुरव

**CNR - MHKO130000652016**

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी वादी यांना न्यायालयामध्ये कागदपत्रे दाखल करण्यासंदर्भात आदेश व्हावेत या विनंतीकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी यांच्या कथनानुसार, वादी यांनी प्रतिवादींकडून प्रतिवादींच्या अज्ञानपणाचा गैरफायदा घेवून दि. २२/०४/२००३ रोजी ९९ वर्षाचे कब्जाचे करारपत्र, रोख खंडाचे करारपत्र व कधीही रद्द न होणारे वटमुख्यतारपत्र अशी कागदपत्रे लिहून घेतली होती. त्यांच्या प्रती वादींनी प्रतिवादीस दिलेल्या होत्या. सदर कागदपत्रांची मूळ कागदपत्रे वादींनी हजर करण्याबाबत आदेश व्हावेत अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे व त्याकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**०३.** सदर अर्जास निशाणी क्र. ३३ अन्वये वादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादींनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे कोणतीही कागदपत्रे वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान झाल्याचे वादींना आठवत नाही. तसेच, तशी कोणतीही कागदपत्रे वादींच्या कब्जामध्ये नाही. सदरचा अर्ज विहीत नमुन्यात नसल्याने तो चालण्यास पात्र नाही. प्रतिवादी यांनी वादी यांना Notice to produce document दिलेली नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही व तो नामंजूर करावा अशी वादीची विनंती आहे.

०४. उभय बाजुच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये अर्ज कोणत्या तरतुदीखाली दिला आहे याचा उल्लेख केला नसला तरी, अर्जातील एकंदरीत

मागणीचा विचार करता, अर्ज हा कागदपत्रे दाखल करण्याचा आदेश होण्यासंदर्भात आहे हे स्पष्टपणे दिसून येते. अशा मागणीकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ११, नियम ५ मध्ये तरतूद नमुद आहे. सदर तरतुदीमधील कलम १ चे अवलोकन करता, दाव्यामधील कोणतीही पार्टी दाव्याच्या कोणत्याही स्थितीत अशाप्रकारची मागणी करु शकते असे त्यामध्ये नमुद आहे. प्रतिवादींनी सदरची कागदपत्रे ही वादीच्या कब्जात असल्याचे कथन केले तरी वादींनी सदरची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे.

**०६.** प्रस्तुत अर्जातील कथने ही शपथेवर आहेत. वादातीत कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती प्रतिवादींनी दि. १०/०२/२०२२ रोजी अभिलेखावर दाखल केल्या आहेत. त्यांचे अवलोकन करता, सदरची कागदपत्रे ही वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान झाली आहेत असे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे, प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जात तथ्य आहे असे मला वाटते. सबब, दिवाणी प्रक्रिया संहितामधील वरील तरतुदींचा विचार करता, प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणे योग्य राहील. सबब, खालील आदेश पारीत करणेत येतो.

## - आ दे श -

१) अर्ज निशाणी क्र. ३१ मंजूर करण्यात येतो.

२) अर्जात नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रे न्यायालयात दाखल करण्यासाठी वादी यांना दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ११ नियम ५ मधील कलम २ अन्वये नोटीस काढण्यात यावी व नमुद कागदपत्रे ०७ दिवसांत दाखल करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed
by Amol Bharat
Jawale
Date: 2023.01.02
17:33:02 +0530

कागल (**अमोल भारत जवळे**)

दिनांकः– ०२/०१/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.